## नाशिक विभाग विकास कार्यक्रम अंतर्गत कृषिमाल पणन सुविधा प्रकल्पाबाबतची माहिती

(Guidelines for projects under Nashik Region Development Programme.)

**१) नाशिक महसूल विभागात फळे, भाजीपाला व फुले करिता शीतसाखळी व मल्टी प्रॉडक्ट प्रक्रिया प्रकल्प स्थापन करणे.**

**अ) फळे, भाजीपाला व फुले निर्यात सुविधा केंद्राची (शीतसाखळी प्रकल्प) उभारणी करणे.** - नाशिक विभागातील द्राक्ष, डाळींब, केळी, इतर फळे व भाजीपाल्याकरिता शीतसाखळी स्थापित करणे. यामध्ये प्रिकुलिंग, कोल्डस्टोरेज, वातानुकुलित वाहन, रायपनिंग इत्यादींचा समावेश असणार आहे.

| अ.क्रं. | प्रकल्पाचे नाव | ठिकाण व जिल्हा |
|---|---|---|
| १. | निर्यात सुविधा केंद्र - डाळींब व कांदा | कळवण जि.नाशिक* |
| २. | निर्यात सुविधा केंद्र - डाळींब | मालेगाव - जि. नाशिक* |
| ३. | निर्यात सुविधा केंद्र - डाळींब, द्राक्षे व पेरु | राहता जि. अहमदनगर* |
| ४. | निर्यात सुविधा केंद्र - केळी | यावल जि. जळगाव* |
| ५. | निर्यात सुविधा केंद्र - केळी | सावदा जि.जळगाव ** |
| ६. | निर्यात सुविधा केंद्र - डाळींब | साक्री जि. धुळे *** |
| ७. | निर्यात सुविधा केंद्र - केळी | शहादा जि. नंदूरबार *** |
| ८. | निर्यात सुविधा केंद्र - फुले | जि. नाशिक *** |

* प्रकल्पाच्या जागा निश्चित झालेल्या आहेत.

** प्रकल्प कार्यान्वित झालेला आहे.

*** प्रकल्पासाठी जागा निश्चित करावयाची आहे.

**वित्तीय आराखडा -**

| अ.क्रं. | तपशील | एकूण खर्चातील वाटा (%) |
|---|---|---|
| १ | लाभार्थी | प्रकल्पासाठी जमीन* |
| २ | महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ | १० |
| ३ | राज्य शासन | १५ |
| ४ | अपेडा, नवी दिल्ली/राज्य फलोत्पादन अभियान | ७५** |
| | एकूण | १०० % |

* लाभार्थ्यांकडे सुमारे २ एकर जमिन असणे आवश्यक आहे.

** अपेडा, नवी दिल्ली, राज्य फलोत्पादन अभियान यांनी मंजूर केल्यानंतर प्रकल्प उभारण्यात येईल.

प्रस्तावित शीतसाखळी प्रकल्पामध्ये खालील सुविधा असणे अपेक्षीत आहे. सदरच्या प्रकल्पाचा जास्तीत जास्त खर्च रु. ३.२५ कोटी अपेक्षीत आहे.

| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| १ | यंत्र सामुग्री |
| २ | प्रीकुलिंग (५ मे.टन/ ६ तास)<br>कोल्ड स्टोरेज (५० मे.टन)<br>रायपनिंग चेंबर (५ मे.टन x ४)<br>ग्रेडिंग सुविधा |
| ३ | वातानुकुलित वाहन -२ |
| ४ | इमारत बांधकाम |

**पात्र लाभार्थी -**

सहकारी संस्था, स्वयंसहाय्यता गट, शेतकरी गट, बाजार समित्या, खरेदी-विक्री संघ, विविध कार्यकारी सहकारी संस्था

**ब) फार्म पॅकहाऊस** (प्रत्येकी सुमारे रु.२५ लाख असे एकूण ४० प्रकल्प):प्रत्येक शीतसाखळी प्रकल्पाभोवती ५ फार्म पॅकहाऊसचा समावेश असेल. डाळींब केळी, द्राक्ष इतर नाशवंत फळे भाजीपाला उत्पादक शेतकरी आपला माल फार्म पॅकहाऊसला आणेल. या ठिकाणी प्राथमिक प्रक्रिया केलेनंतर तो मुख्य केंद्रामध्ये पाठविला जाईल.

**प्रत्येक पॅकहाऊससाठी अपेक्षित खर्चाचा तपशील**

| अ.क्रं. | तपशील | रक्कम (रु. लाख) |
|---|---|---|
| १ | स्थापत्य कामकाज (१७५ चौ. मी.) | २०.०० |
| २ | यंत्रसामुग्री खर्च | ५.०० |
| | वजन काटे (२ ) | |
| | प्रतवारी टेबल (stainless steel) | |
| | रिफ्रॅक्टोमीटर | |
| | डी.जी. सेट (५० KVA) | |
| ३ | क्रेटस/कोरुगेटेड बॉक्सेस | |
| ४ | केमिकल्स | |
| | **एकूण** | **२५.००** |

**प्रस्तावित वित्तीय आराखडा**

| अ.क्रं. | तपशील | एकूण खर्चातील वाटा (%) |
|---|---|---|
| १ | लाभार्थी | प्रकल्पासाठी जमीन* |
| २ | महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ | १० |
| ३ | राज्य शासन | १५ |
| ३ | अपेडा, नवी दिल्ली/राज्य फलोत्पादन अभियान | ७५** |
| | **एकूण** | **१००** |

* लाभार्थ्याकडे १ एकर पर्यंत जमीन असणे अपेक्षित आहे.

** अपेडा, नवी दिल्ली, राज्य फलोत्पादन अभियान यांनी मंजूर केल्यानंतर प्रकल्प उभारण्यात येईल.

**पात्र लाभार्थी -**

सहकारी संस्था, स्वयंसहाय्यता गट, शेतकरी गट, बाजार समित्या, खरेदी-विक्री संघ, विविध कार्यकारी सहकारी संस्था

**क) मल्टी प्रॉडक्ट प्रक्रिया केंद्र उभारणी** (प्रत्येकी १० सुमारे कोटीचे ३ प्रकल्प) द्राक्ष, डाळींब, केळी, टोमॅटो,इतर फळे व भाजीपाल्यावर प्रक्रिया करण्याकरिता मल्टी प्रॉडक्ट प्रक्रिया केंद्राची उभारणी करण्यात येईल.त्यानुसार जिल्हावार विभागणी पुढीलप्रमाणे

नाशिक - १, अहमदनगर - १ व धुळे अथवा नंदूरबार - १

**मल्टी प्रॉडक्ट प्रक्रिया केंद्रमधील समाविष्ट घटक**

मल्टी फ्रुट अँड व्हेजिटेबल प्रोसेसिग युनिट, रायपनिंग चेंबर, शीतगृहे, रिफर व्हॅन्स, ETP व इतर.

**प्रत्येक केंद्राचा अपेक्षित खर्चाचा तपशील**

| अ.क्रं. | तपशील | एकूण खर्चातील वाटा (%) | रक्कम (रु. कोटीत) |
|---|---|---|---|
| १ | केंद्र शासन - अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय | ५०* | ५.०० |
| २ | खाजगी भागीदार फर्म/ खाजगी कंपनी | ५० + प्रकल्पासाठी जमीन | ५.०० |
| | **एकूण** | **१००** | **१०.००** |

* अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय (केंद्रशासन ) यांनी मंजूर केलेनंतर प्रकल्प उभारण्यात येईल.

एकूण मल्टी प्रॉडक्ट प्रक्रिया केंद्र - ३

**पात्र लाभार्थी -**

इच्छुक भागीदारी फर्म, खाजगी कंपन्या.

**२) प्रकल्प अहवाल-**

प्रकल्प अहवाल बँकेबल व्हावा या दृष्टीने खालील बाबींचा उहापोह त्यात असावा असे वाटते.

- Summary, Highlight of the Project.
- Introduction of Project (Background & need)
- Project Concept ( Some Details of Project)
- Market Potential ( Domestic / Export)
- The Promoter of the project & about society.
- Process & capacity Utilization
- Financial Analysis ( with Assumption & financial indicators)
- Conclusion

अथवा, प्रकल्प अहवाल पणन मंडळाकडून करून घ्यावयाचा असल्यास लेखी संमती द्यावी. प्रकल्प तयार करुन देण्यासाठी पणन मंडळामार्फत २ कोटीपर्यंतच्या प्रकल्पासाठी अंदाजीत खर्चाच्या ०.४ टक्के + सेवाकर तर रु.२ कोटी ते ५ कोटी प्रकल्पासाठी रु. १.०० लाख + सेवाकर एवढे सेवाशुल्क आकारले जाते. या व्यतीरीक्त सोबत जोडलेल्या प्रश्नावलीनुसार कागदपत्रे व माहिती सादर करावी. तरी प्रकल्प अहवाल या कार्यालयास पाठवावा किंवा पणन मंडळाने अहवाल करावयाचा असल्यास आपली संमती कळवावी व प्रश्नावलीनुसार कागदपत्रे सादर करावीत.

**३)प्रकल्प अहवाल तयार करणेकरिता अत्यावश्यक असणारी माहिती**

१ प्रस्तावित प्रकल्पाचे नाव :-

२ प्रकल्पाचे स्वरुप :- प्रक्रिया प्रकल्पाचे नाव व क्षमता (प्रतिदिन व वार्षिक)

३ प्रस्तावित प्रकल्प ज्या भागात सुरु करण्यात येणार आहे त्या भागाच्या कार्यक्षेत्राविषयी सविस्तर माहिती द्यावी.

४ त्या भागातील प्रक्रिया प्रकल्प व इतर प्रकल्पांची सविस्तर माहिती द्यावी, व हा प्रकल्प आपणास का करावासा वाटतो याची सविस्तर टिपणी द्यावी.

५ प्रक्रिया क्षेत्रात आपला पूर्वीचा काही अनुभव असल्यास सविस्तर माहिती द्यावी.

६ प्रकल्पासाठीची जागा संस्थेच्यी स्वत:ची आहे की भाडे तत्वावर घेणार आहात किंवा विकत घेणार आहात त्याची सविस्तर माहिती द्यावी. तसेच संबंधितांकडून प्रकल्प सुरु करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र जोडावे.

७ प्रकल्पाच्या ठिकाणी पाणी पुरवठ्याची काय सोय आहे? असल्यास किती कालावधीपर्यंत व किती प्रमाणात पाणी पुरवठा होऊ शकतो, नसल्यास कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे? पाणी उपलब्धतेबाबत संबंधित यंत्रणेचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

८ विद्युत पुरवठ्याबाबत कोणती सोय आहे? ट्रासफॉर्मर इ. ची सोय आहे काय? विद्युत मंडळाचे ना हरकत प्रमाणपत्र जोडावे.

९ संस्थेच्या कार्यक्षेत्रातील/ जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर घेण्यात येणा-या संबंधित पिकांची सविस्तर माहिती द्यावी. संबंधित अधिका-यांचे कार्यक्षेत्रानुसार प्रमाणपत्र (तालुका/जिल्हा) कृषि अधिकारी

| अ.क्र. | पिकाचा सविस्तर तपशील | क्षेत्र (हेक्टर) | उत्पादन (क्विंटल) | आवक कालावधी | कमाल दराचा कालावधी | सरासरी भाव |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

१० कार्यक्षेत्रातून प्रकल्पाकरिता उपलब्ध होणा-या कच्च्या मालाचे प्रमाण व सरासरी दर काय असेल? (मागील वर्षातील महिनावार दरपत्रे कृषि उत्पन्न बाजार समिती यांचेकडून प्रमाणित करुन पाठवावीत.)

११ संस्थेच्या प्रत्येक सभासदांकडून प्रकल्पाकरिता उपलब्ध होणा-या कच्च्या मालाचे प्रमाण व त्यांचे सरासरी दर काय द्यावे लागतील? याबाबत सविस्तर तपशील द्यावा.

१२ संस्थेच्या पायाभूत सुविधांची माहिती (उदा. वाहन, गोदाम / शितगृह / प्रशितगृह (क्षमता), इमारत इ.)

१३ प्रकल्पाच्या प्रस्तावित जागेपासून खालील बाबींचे अंतर (कि.मी.) किती असेल. रेल्वे स्टेशन ........ स्थानिक बाजारपेठ........ शहराचे अंतर ......... राष्ट्रीय महामार्ग ............ विमानतळ................

१४ उत्पादित मालाची विक्री कोठे करणार आहात.

१. स्थानिक बाजारपेठ : -
२. परराज्यात पाठवणार : -
३. निर्यात करणार : -
४. इत्यादी : -

१५ मुख्य प्रवर्तक व बोर्ड ऑफ डायरेक्टर्स विषयी माहिती, यांचे पाठीमागील कार्याची व पुढील योजनांची सविस्तर टिपणी द्यावी.

१६ प्रकल्प जागेचा ७ / १२ उतारा, साईट आराखडा इ. पाठवावे.

**नोट - आपणास लागू असणा-या बाबी विचारात घ्याव्यात.**

(प्रवर्तकाची स्वाक्षरी
संस्थेच्या शिक्क्यासह)

१. **वित्तीय आराखडयाबाबत -**

| | फार्म पॅक हाऊस व शीतसाखळी प्रकल्प |
|---|---|
| १. लाभार्थी | प्रकल्पासाठी जमीन |
| २. पणन मंडळ | १०% |
| ३. राज्य शासन | १५% |
| ४. अनुदान (APEDA/NHM/State Govt.) | ७५% |

२. शासन निर्णयातील तरतूदीमध्ये वित्तीय आराखड्यात बदल झाल्यास सुधारीत प्रकल्प अहवाल सादर करावा लागेल.

३. मल्टी प्रॉडक्ट प्रक्रिया प्रकल्पाकरिता ५० % स्वनिधी व ५० % अनुदान अपेक्षित आहे.

४. सर्व प्रकल्पाकरिता अनुदान बॅकएंडेड (Back Ended Subsidy) स्वरुपात असणार आहे.

**४)कांदा चाळ योजना**

या कार्यक्रमाअंतर्गत जे शेतकरी नव्याने कांदाचाळी उभारतील त्याना अनुदान देण्यात येणार आहे. त्यामुळे शेतक-यांनी नव्याने कांदाचाळी उभारुन संबंधित बाजार समितीमध्ये त्यांचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर प्रस्ताव दाखल करावे.